**नि.फौ.ख.क्र.३२५/२०१९**
सरकार वि.प्रभाकर
निशाणी क्र.३१

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | :– | आम्रपाली दिवाकर खोब्रागडे, |
| **वय** | :– | २४ वर्षे, **धंदा** :– शिक्षण |
| **राहणार** | :– | कवठा, ता.सावनेर,जि. नागपूर. |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए.सी.चलाख विद्यमान सहा.सरकारी वकील यांच्यामार्फत</u>**

प्रभाकर खोब्रागडे यांना मी ओळखते, ते माझे काका आहेत. उज्वला खोब्रागडे ही माझी आई आहे. घटना दि.३०.०७.२०१९ रोजी माझ्या घरी घडली होती. माझे काका प्रभाकर यांनी माझ्या वडीलांना लोखंडी रॉडने मारहाण केली होती. त्यांना डोक्याला जखम झाली होती. मी माझ्या वडीलांच्या डोक्याला पट्टी बांधली व लगेच त्यांना दवाखान्यात घेऊन गेलो. मी तिथे हजर होती. सदर लोखंडी रॉड मला दाखवल्यास मी ओळखू शकते. माझे काका आज न्यायालयात हजर आहेत. आता मला वस्तू क्र.–अ वरील लोखंडी सळाख दाखविण्यात आली. ती तीच सळाख आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे – श्री.सरोदे वकील यांच्यामार्फत</u>**

२. मी सरस्वती महाविद्यालय सावनेर येथे बी.ए.च्या अंतीम वर्षाचे शिक्षण घेत आहे. मी ११ – १२ वीचे शिक्षण केळवद मध्ये घेतलेले आहे. मी रोज शाळेत जात होती. आमच्या शाळेला रविवारी सूट्टी राहत असे. माझ्या शाळेची वेळ ११ ते दूपारी ३ अशी होती. घटनास्थळावर आजूबाजूचे लोक जमले नव्हते. पोलिसांनी त्याचदिवशी माझे बयाण घेतले होते. मी माझ्या वडीलांना पट्टी बांधल्याचे बयाण देतांना पोलिसांना सांगीतले होते. सदर बाब माझ्या बयाणात नमूद नसल्याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतल्याप्रमाणे कूठलीही घटना घडली नाही केवळ माझ्या आई वडीलांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे

खरे नाही की, माझे प्रभाकर यांनी माझ्या वडीलांना मारल्याचे व त्यामूळे त्यांना जखम झाल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. वस्तू क्र.–अ वरील सळाख कोणी कूठून कूणासमक्ष जप्त केली याविषयी मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वस्तू क्र.–अ ने माझ्या वडीलांना मारहाण झाल्याचे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती
समक्ष

दिनांक –१५.१०.२०२४.

(श्रीमती एन.व्ही. रणवीर)
२ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
सावनेर.

**नि.फौ.ख.क्र.३२५/२०१९**
सरकार वि.प्रभाकर
निशाणी क्र.३२

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | :– | घनश्याम चंद्रभान कोटाडे, |
| **वय** | :– | ४८ वर्षे, **धंदा** :– मिस्त्री काम, |
| **राहणार** | :– | खयपूरा केळवद, ता.सावनेर,जि. नागपूर. |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए.सी.चलाख विद्यमान सहा.सरकारी वकील यांच्यामार्फत</u>**

मी उज्वला खोब्रागडे यांना ओळखतो. त्यांच्या घरी मी मिस्त्री काम करायला गेलो होतो. घटना अंदाजे तीन ते चार वर्षाच्या आधीची आहे. त्यावेळी आम्ही जेवण करायसाठी घरी आलो होतो त्यादरम्यान काय झाले हे मला माहित नाही.

**(साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयाणाशी विसंगत साक्ष देत असल्याने विद्यमान सरकारी वकीलांनी उलटतपासात विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात येत आहे.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष प्रभाकर खोब्रागडे याने दिवाकर खोब्रागडे यांच्या डोक्यावर मारले, त्यामूळे त्यांच्या डोक्यावर जखम झाली, त्यांचे डोके फूटून रक्त निघाले. हे मला माहित नाही की, दिवाकर यांची पत्नी त्यांना वाचवायला गेली असता प्रभाकरने तीला सूद्धा धक्काबूक्की केली व शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, मी व विजय नवघरे यांनी दोघांची भांडणे सोडवली व त्यांना वेगळे केले. आता मला पोलिस बयाणातील कंसातील भाग अ वाचून दाखवला. तो बरोबर नाही. पोलिसांनी तो तसा का लिहीला याचे कारण मला सांगता येणार नाही.

उलटतपास आरोपीतर्फे - श्री.सरोदे वकील यांच्यामार्फत
नाकारला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती
समक्ष

दिनांक -१५.१०.२०२४.

(श्रीमती एन.व्ही. रणवीर)
२ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
सावनेर.